# ऋणनिर्देश

"**वसंत नरहर फेणे यांच्या कथालेखनाचे विशेष**" ("**ज्याच्या त्याचा क्रूस**" **आणि** "**पाणसावल्यांची वसाहत**" **या कथासंग्रहाच्या अनुषगांने**) या विषयाच्या एम.फिल. लघुप्रबंधाचा अभ्यास व लेखन करीत असताना अनेक व्यक्तींचे जिव्हाळ्याचे व आपलेपणाचे सहकार्य लाभले.

माझे मार्गदर्शक **डॉ. सुनिल वामन चंदनशिवे सर** यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. प्रबंधांच्या विषय निवडीपासून ते शेवटपर्यंत त्यांनी वेळोवेळी प्रोत्साहन देवून, माझा उत्साह वाढविला. म्हणून मी हे काम पूर्ण करू शकलो. त्यांचे हे ऋण शब्दात व्यक्त न करता येण्याजागेच आहे. त्यामुळे त्यांच्या ऋणातच राहणे मी पसंत करीन.

शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख **डॉ. विश्वनाथ शिंदे सर, डॉ. कृष्णा किरवले सर, डॉ. रविंद्र ठाकूर सर** यांनी हा प्रबंध पूर्ण करण्यास प्रेरणा देवून वेळोवेळी आत्मीयतेने सहकार्य केल्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

या प्रबंधलेखनात लेखक **वसंत नरहर फेणे** यांनी स्वत: वेळोवेळी पुस्तकांचे, लेखांचे संदर्भ देऊन एम.फिल.च्या संशोधन कार्यासाठी माहिती उपलब्ध करून दिली. हे त्यांचे सहकार्य व वेळोवेळी मार्गदर्शन मला संशोधन कार्यास उपयोगी पडले. त्यामुळे मी त्यांचा आभारी आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या **बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सेवक वर्ग तसेच जनसेवा वाचन मंदीर, शिरोली** या ग्रंथालयानेही संदर्भ पुस्तके उपलब्ध करून दिली. याबद्दल मी या सर्वांचा आभारी आहे.

या संशोधन कार्यासाठी माझ्या मित्रपरिवारानींही खारीचा वाटा उचलला आहे. श्री. विठ्ठल रणदिवे, श्री. संजय खराडे, श्री. सुभाष कांबळे, श्री. विकास कवठेकर, श्री. संदीप कांबळे, श्री. दशरथ पुजारी, श्री. हरी पुजारी, श्री. बाळासो चिकोडीकर, श्री. नितीन तांबडे, श्री. सुरेश तांबडे, श्री. दिग्विजय नाईक, श्री. संजय उबाळे, श्री. बालाजी पाटील, गजानन डोलारे या सर्वांचाही मी ऋणी आहे.

खडतर जीवनाशी सामना देत असताना सुद्धा माझ्या विषयीचे एक वेगळे स्वप्न ज्यांनी उराशी बाळगले, त्यांच्या या तपश्चर्येमुळेच हे स्वप्न या प्रबंधाद्वारे मी साकार करू शकलो ते माझे **वडील आण्णाप्पा गावडे व आई सौ. सुलाबाई गावडे** यांच्या आशीर्वादाच्या बळावर व माझी सुशील पत्नी अन्नपूर्णा गावडे, माझा भाऊ निवास गावडे तसेच मारूती गावडे, कृष्णात गावडे, आप्पासो गावडे यांचेही वेळोवेळी सहकार्य मिळत गेले. यांच्या प्रेरणेनेच या प्रबंधाचे काम तडीस गेले. या सर्वांनी मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले. त्यांनी तर मला कायमचेच ऋणात ठेवले आहे.

या प्रबंधाच्या कॉम्प्युटर टायपिंगचे काम वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल **सौ. रेवती धामणकर (उमेद एंटरप्रायजेस)** व एम.फिल. च्या प्रबंध लेखनास अशा अनेक ज्ञात-अज्ञात व्यक्तींनी मला सहकार्य केले. त्या सर्वांचा मी आभारी आहे.

-अभ्यासक-

**अशोक आण्णाप्पा गावडे**